डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
**प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला—४१६ ५१६**
दूरध्वनी (02366) 262234 TeleFax E-mail : adrfruitsvengurla@gmail.com

जा.क्र. ससंस/प्राफसंकें/वादेक/ 1345 /२०१८ दिनांक : 5 APR 2018

प्रति,

_________________,
_________________,
_________________.

विषय : प्राफसंकें, वेंगुर्ले या कार्यालयातील संगणकांची दुरूस्ती तसेच देखभाल करणेकरीता वार्षिक देखभाल करार करणेबाबत..

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले या कार्यालया अंतर्गत वेंगुर्ला येथील विविध विभागात कार्यरत असलेल्या एकूण २१ संगणकाची एका वर्षासाठी देखभाल तसेच दुरूस्ती करणेसाठी वार्षिक देखभाल करार (Annual Maintenance Contract) करण्यास इच्छूक संगणक दुरूस्तीदारांकडून वार्षिक देखभाल करणेसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी वर नमूद केल्याप्रमाणे संगणक दुरूस्तीसाठी वार्षिक देखभाल करार करण्यास आपण इच्छूक असल्यास त्यासाठीचे आपले दरपत्रक निम्नस्वाक्षरीकार यांचे नांवे दिनांक १३/०४/२०१८ पर्यंत या कार्यालयास पोहोचेल अशा बेताने पाठवावे. दरपत्रकामध्ये अटी व शर्तीचा स्पष्ट उल्लेख करावा.

दरपत्रकाच्या लखोटयावर 'संगणक देखभाल करारासाठी दरपत्रक' असा उल्लेख असावा. विहित मुदतीच्या नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

कृपया आपले दरपत्रक लवकरात लवकर पाठवावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ले, जि. सिंधुदूर्ग

**अटी व शर्ती** :

१) या कार्यालयातील विविध विभाग/शाखामध्ये असलेल्या एकूण २१ संगणकाची दुरूस्ती कार्यालयात येवून करावी लागेल. दुरूस्तीकरीता संगणक बाहेर किंवा दुरूस्ती केंद्रावर पाठविला जाणार नाही.

२) दरपत्रकावर VAT TIN क्रमांक नमूद असणे आवश्यक आहे.

३) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे तसेच सदरील प्रक्रिया रद्दबातल ठरविणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे.